# <u>माती नाही माझी माता तू आहे</u>

माती नाही माझी माता तू आहे म्हणून तुझी मूर्ती करून मी पुजते
वेगवेगळी रूपे घेवून मला जगवते नाईलाज म्हुणुन मी तुला तुडवते-

भिंतीचे रूप घेवून मला रक्षिते अज्ञानी मी तुज धूळ म्हणीते
गुरुत्वाकर्षणाने तू मला आधार देते अजानतेने मी आभा पूजिते-

तऱ्हेतऱ्हेच्या गुणांनी मला सुखावते मी मात्र निरागसतेने दुखावते
जन्माआधी आणि माझ्या मृत्युनंतर तुझे रूप घेणार आहे मी निरंतर-

तुझ्या उदारपणाला कसे वर्णांवे अल्पार्थी शब्द वर्जुन मौन स्वीकारे
क्षमाभाव तुझा मी पुजावा किती सकलांना उदरात सामावून घेशी-

माती नाही माझी माता तू आहे म्हणून तुझी मूर्ती करून मी पुजते